PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Bapu Biru Vategaonkar
Year:

Song: Bapu Biruch Roop Tu Gheshil Ka
Lyricist:

जशी पिकाला कीड लागूनी
टोळधाडीनं खाल्लं
तशी गावाला दृष्ट लागली
लई लई वंगाळ झालं
ढाण्या वाघानं केली करामत
पाप गाडलं मातीत
आवं गावदिवाळी झाली साजरी
दिवं उजळलं रातीत
कुणी असा कुणीतरी असा
आवं कुणी असा कुणीतरी असा
देवमाणूस आम्हाला दावशील का
देवमाणूस आम्हाला दावशील का
बापू बिरूचं रूप तू घेशील का
बापू बिरूचं रूप तू घेशील का
माझ्या बिरं देवा
माझ्या बिरं देवा
माझ्या बिरं देवा
माझ्या बिरं देवा
माझ्या बिरं देवा
माझ्या बिरं देवा

नारीच्या गं रूपावरी
जसा लांडगा टपला
नारीच्या गं रूपावरी
जसा लांडगा टपला
माझ्या देवमानसानं
ठेवा अब्रूचा जपला
माझ्या देवमानसानं
ठेवा अब्रूचा जपला

कौरवांच्या सभमंधी
किस्न होऊन धावला
कौरवांच्या सभमंधी
किस्न होऊन धावला
बापू बिरूच्या रूपानं
माझा बिरोवा पावला
बापू बिरूच्या रूपानं
माझा बिरोवा पावला
कुणी असा कुणी तरी असा
भाऊबीज भनीकडं धाडशीलं का
भाऊबीज भनीकडं धाडशीलं का
बापू बिरूचं रूप तू घेशील का
बापू बिरूचं रूप तू घेशील का
माझ्या बिरं देवा
माझ्या बिरं देवा
माझ्या बिरं देवा
माझ्या बिरं देवा
माझ्या बिरं देवा
माझ्या बिरं देवा

हे भलरी भलरी
भलकरी दादा भलरी आ हां...
हे भलरी भलरी
भलकरी दादा भलरी आ हां...
लई मायाळू बापू बिरू
काय सांगावी कीर्ती रं हां ...
लई मायाळू बापू बिरू
काय सांगावी कीर्ती रं हां ...
आमच्या तोंडी मोत्याचा घास

PlanetRead

Literacy for a Billion

घास भरविला हाती रं
आमच्या तोंडी मोत्याचा घास
घास भरविला हाती रं
सेवा केली गावाची
धर्म पाळला समतेचा
सेवा केली गावाची
धर्म पाळला समतेचा
काळया आईनं पाठीवरी
हात फिरविला ममतेचा
काळया आईनं पाठीवरी
हात फिरविला ममतेचा
कुणी असा कुणीतरी असा
हुरडा खायाला खळयावर येशील का
हुरडा खायाला खळयावर येशील का
बापू बिरूचं रूप तू घेशील का
बापू बिरूचं रूप तू घेशील का
माझ्या बिरं देवा
माझ्या बिरं देवा
माझ्या बिरं देवा
माझ्या बिरं देवा
माझ्या बिरं देवा
माझ्या बिरं देवा
धर्माच्या ह्या भावानं
दिला मोठा पसा गं
दिला मोठा पसा गं
संसारी मी पाळला
सावित्रीचा वसा गं
सावित्रीचा वसा गं
काळजाचा करंडा कुकवानं भरावा
कुकवानं भरावा
सत्यवान माझा गं औक्षवंत ठरावा
औक्षवंत ठरावा
सत्यवान माझा गं औक्षवंत ठरावा
औक्षवंत ठरावा
कुणी असा आवं कुणीतरी असा
बापू बिरूला औक्ष माझं देशील का
बापू बिरूला औक्ष माझं देशील का
बापू बिरूचं रूप तू घेशील का
बापू बिरूचं रूप तू घेशील का
माझ्या बिरं देवा
माझ्या बिरं देवा
माझ्या बिरं देवा
माझ्या बिरं देवा
माझ्या बिरं देवा
माझ्या बिरं देवा
माझ्या बिरं देवा
माझ्या बिरं देवा

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*